2 6 JAN 2026

पुढारी

# विद्यापीठात दि. २९, ३० रोजी राजर्षी शाहू संगीत रजनी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे दि. २९ व ३० रोजी राजर्षी शाहू संगीत रजनी कार्यक्रमाचे सायं. ५.३० वा. राम गणेश गडकरी सभागृह, पेटाळा येथे होणार असून उद्घाटन प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. पहिल्या सत्रामध्ये मौशमी जाजू, पुणे यांचा कथ्थक नृत्य, दुसऱ्या सत्रात गांधार देशपांडे, मुंबई यांचे शास्त्रीय गायन होईल. दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात डॉ. सुधांशू कुलकर्णी व सारंग कुलकर्णी, बेळगाव यांच्या हार्मोनियम वादनाची जुगलबंदी रंगणार आहे. दुसऱ्या सत्रात पं. विजय कोपरकर, पुणे यांच्या शास्त्रीय गायनाने राजर्षी शाहू संगीत रजनीची सांगता होणार आहे.

2 6 JAN 2026 जनप्रवास

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

# पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे यश

**जनप्रवास : कोल्हापूर**

शैक्षणिक वर्ष २०२५ -२०२६ मधील पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धा सरदार पटेल विद्यापीठ, गुजरात येथे २० व २१ जानेवारी या कालावधीत आयोजित केली होती. या स्पर्धेमधील ६ संशोधन शाखेसाठी शिवाजी विद्यापीठामार्फत २३ जणांचा संघ सहभागी झाला होता. विद्यापीठ संघामधील इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी या शाखेतून शुभम तानाजी गिरीगोसावी, तेजस दिलीप यादव, नीलेश सदानंद सूर्यवंशी व स्वप्नाली मगदूम यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला.



कोल्हापूर : पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत यश मिळवणारा विद्यापीठ संघातील यशस्वी विद्यार्थीवर्ग.

या विद्यार्थ्यांसोबत संघव्यवस्थापक म्हणून डॉ. एम. पी. भिलावे, प्राणीशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ व डॉ. श्रीमती कविता वड्राळे, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, शिवाजी विद्यापीठ आणि प्रा. प्रणाली टाकले, भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ फर्मसी, कोल्हापूर हे उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी विद्यापीठ संघास प्रा. डॉ. सुरेश गोसावी मा. कुलगुरु प्रा. डॉ. जे. पी. जाधव, मा. प्र-कुलगुरु, डॉ. व्ही. एन. शिंदे, मा. कुलसचिव, डॉ. टी एम चौगले, संचालक, विद्यार्थी विकास, डॉ. पी. के. पवार, अविष्कार समन्वयक व विद्यार्थी विकास विभागातील सर्व प्रशासकीय सेवक यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

26 JAN 2026

पुढारी

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

# ढगनिर्मितीत 'प्रदूषणाचा' अडथळा; पाऊस घटला, 'तीव्रता' वाढली!

१ मोसमातील ५१ टक्के पाऊस कोसळतोय अवघ्या दोन महिन्यांतच

२ कोल्हापूर, पुणे, मुंबईसह राज्यातील ११ शहरांवर संकट

३ वाहनांच्या धुरामुळे बाष्पाचे रूपांतर पावसाच्या थेंबात होण्याच्या प्रक्रियेत बदल

**कोल्हापूर : आशिष शिंदे**

वाढते शहरीकरण आणि प्रदूषणामुळे केवळ तापमानच वाढले नाही, तर चक्क ढगनिर्मितीची नैसर्गिक प्रक्रियाच बाधित झाली आहे. हवेतील प्रदूषित कणांमुळे (एरोसोल्स) ढगांच्या रचनेत अडथळे निर्माण होत असल्याने पावसाचे एकूण प्रमाण घटले आहे. मात्र जेव्हा पाऊस पडतो, तेव्हा तो इतका तीव्र असतो की, वर्षाचा तब्बल ५१.६ टक्के पाऊस अवघ्या दोन महिन्यांतच कोसळत आहे. शिवाजी विद्यापीठाच्या संशोधनातून हा धक्कादायक निष्कर्ष समोर आला आहे.

सोप्या भाषेत सांगायचे तर कोल्हापूरला वर्षभरात जेवढे पाणी मिळते, त्यातील निम्मे पाणी निसर्ग फक्त ६० दिवसांत ओतून मोकळा होतो. उरलेले १० महिने शहराला कोरड्या हवामानाचा सामना करावा लागतो. यामुळे धरणांचे नियोजन कोलमडते आणि शहरात पाणी साचण्याचे प्रकार वाढतात. शिवाजी विद्यापीठातील संशोधकांनी गेल्या तीस वर्षांतील देशातील ७० शहरांच्या पावसाचा अभ्यास केला. यात कोल्हापूर, मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नांदेड, सांगली, सोलापूर आणि मालेगाव या महाराष्ट्रातील ११ शहरांचा समावेश आहे. संशोधनानुसार शहरांमधील उष्णता (अर्बन हीट आयलंड) आणि वाहनांचा धूर यामुळे आकाशात जाणाऱ्या बाष्पाचे रूपांतर पावसाच्या थेंबात होण्याच्या प्रक्रियेत बदल झाला आहे. प्रदूषित कणांमुळे ढग जास्त काळ पाणी धरून ठेवतात आणि जेव्हा बरसतात तेव्हा ढगफुटीसारखे कोसळतात.

## प्रदूषणामुळे ढगांत नक्की काय घडते?

शहरातील वाहने आणि कारखान्यांच्या धुरामुळे हवेत 'एरोसोल्स'चे (सूक्ष्म कण) प्रमाण वाढते. ढग तयार होताना हे कण बाष्प शोषून घेतात. प्रदूषण जास्त असल्याने ढगांमधील पाण्याचे थेंब लवकर जड होत नाहीत. त्यामुळे ढग पूर्ण भरल्यावर अचानक एकाच वेळी मुसळधार पाऊस पडतो.

> "शहरी प्रदूषण आणि काँक्रीटमुळे निर्माण होणारी उष्णता स्थानिक हवामानावर गंभीर परिणाम करत आहे. ढग निर्मितीच्या प्रक्रियेतील अडथळ्यांमुळे पावसाचे दिवस कमी झाले आहेत. पण तीव्रता वाढली आहे. हे रोखण्यासाठी ग्रीन कव्हर वाढवणे हा उपाय आहे.
>
> - **डॉ. सुमंत दंडपाथ**, संशोधक, भूगोलशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ

2 6 JAN 2026

तरुण भारत

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

# जबाबदार नेतृत्व विकसीत होण्याची गरज

## डॉ. विलास शिंदे : शिवाजी विद्यापीठाच्या पाच दिवसीय नेतृत्व विकास शिबिराचा समारोप

प्रतिनिधी
कोल्हापूर

नेतृत्व म्हणजे केवळ पद अथवा अधिकार नसून समाजाप्रती असलेली जबाबदारी, मूल्यनिष्ठा, संवेदनशीलता आणि योग्य निर्णयक्षमता आहे. परिपूर्ण व जबाबदार नेतृत्व विकसित होणे ही आजच्या काळाची गरज असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.विलास शिंदे यांनी केले.

युवकांवरील वाढत्या जबाबदाऱ्या, समाजघडणीत युवक नेतृत्वाची भूमिका आणि आदर्श युवक नेत्यांचे गुणधर्म यावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात पाचदिवशीय नेतृत्व विकास शिबिराच्या समारोपप्रसंगी उपस्थित मान्यवर.

शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग, सेंटर फॉर लीडरशिप डेव्हलपमेंट आणि बहाई अकॅडमी, पाचगणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पाचदिवसीय नेतृत्व विकास शिबिराचा समारोप गुरुवारी झाला. या समारोपप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी बहाई अकॅडमीचे संचालक लेसन आझादी यांनी मूल्याधिष्ठित नेतृत्वाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच अमेरिकेतील अर्थशास्त्राचे प्राध्यापक जेम्स वेस्ट यांनी आंतरराष्ट्रीय एकात्मतेची गरज आणि जागतिक स्तरावरील नेतृत्व संकल्पना स्पष्ट केली. विद्यार्थी विकास संचालक डॉ. टी. एम. चौगुले यांनी प्रास्ताविक करून पाहुण्यांचा परिचय करून दिला. नेतृत्व विकास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले.

शिबिराच्या कालावधीत नेतृत्व कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक बांधिलकी आणि मूल्याधिष्ठित नेतृत्व या विषयांवर विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण ७० विद्यार्थी सहभागी झाले होते. सहभागी विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून नेतृत्वाविषयी नवे दृष्टिकोन आणि आत्मविश्वास मिळाल्याची भावना व्यक्त केली. यावेळी विद्यार्थी विकास विभागाच्या सुरेखा आडके, विजय इंगवले यांच्यासह बहाई अकॅडमीचे पराग, प्रीती, मारुती कांबळे, चव्हाण, अल्पेश आदी उपस्थित होते.

26 JAN 2026

तरुण भारत

# नेताजी सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरे जयंती

**कोल्हापूर :** नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती विद्यापीठात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आज सकाळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि वित्त व लेखाधिकारी डॉ.सुहासिनी पाटील यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ.राजाराम गुरव, डॉ.धनंजय सुतार, डॉ. तानाजी चैगुले, डॉ.सागर डेळेकर, डॉ.शरद बनसोडे, भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.राजेंद्र सोनकवडे, संगणकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.कविता ओझा, डॉ. उर्मिला पौळ, डॉ.केशव राजपुरे, डॉ.निलेश तरवाळ, डॉ.मानसिंग टाकळे, डॉ.सिबा दास,डॉ.मक्सूद वायकर, डॉ.सत्यजित पाटील, डॉ.अमितकुमार पाटील, डॉ. विजय कुंभार, डॉ.कबीर खराडे, डॉ. शितल गायकवाड, प्रसाद गोयल यांचेसह शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

2 6 JAN 2026
पुढारी
जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

# विद्यापीठ, महाविद्यालयांत आता समता समिती बंधनकारक

## यूजीसीकडून अधिसूचना जारी; अनुसूचित जाती-जमाती, महिला, दिव्यांगांचा समितीत समावेश

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

उच्च शिक्षण संस्थांमधील भेदभाव समूळ नष्ट करून समता प्रस्थापित करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) मोठा निर्णय घेतला आहे. यूजीसीने विद्यापीठ आणि प्रत्येक महाविद्यालयात समता समिती स्थापन करणे बंधनकारक केले आहे. या समितीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, महिला तसेच दिव्यांग प्रतिनिधींचा समावेश असणार आहे. या निर्णयामुळे वंचित घटकातील विद्यार्थ्यांना सुरक्षित व समान शैक्षणिक वातावरण मिळणार आहे.

रोहित वेमुला व पायल तडवी यांच्या आत्महत्येनंतर शैक्षणिक संस्थांतील जातीय भेदभावाचा प्रश्न देश पातळीवर ऐरणीवर आला होता. या प्रकरणांनंतर संबंधित विद्यार्थ्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सुनावणीदरम्यान न्यायालयाने २०१२ च्या नियमावलीतील त्रुटींवर बोट



ठेवत यूजीसीला अधिक प्रभावी व कठोर नियमावली तयार करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार फेब्रुवारी २०२५ मध्ये मसुदा तयार करण्यात आला. आता दि. १३ जानेवारी २०२६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेद्वारे नियम लागू करण्यात आले आहेत.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने तयार केलेले हे नियम धर्म, जात, लिंग, जन्मस्थान, वंश किंवा दिव्यांगत्वाच्या आधारावर होणारा कोणताही भेदभाव रोखण्यावर लक्ष केंद्रित करणार आहेत. विशेषतः अनुसूचित जाती-जमाती, अन्य मागासवर्गीय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण या नियमांद्वारे केले जाणार आहे. समता समितीला भेदभावाच्या तक्रारींची चौकशी, पीडित विद्यार्थ्यांना समुपदेशन, शैक्षणिक व सामाजिक मार्गदर्शन देण्याचे अधिकार असणार आहेत. केवळ कायदेशीर कारवाईपुरते न थांबता विद्यार्थ्यांना मानसिक आधार देणे समितीची जबाबदारी असेल.

### प्रभावी अंमलबजावणी न केल्यास कारवाई

नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर यूजीसीकडून अनुदान थांबवणे, अभ्यासक्रम रद्द करणे, यूजीसी मान्यता रद्द करणे अशी कडक कारवाई केली जाणार आहे. हे नियम लागू झाल्याने उच्च शिक्षण संस्थांमध्ये पारदर्शक, सुरक्षित व समताधिष्ठित वातावरण निर्माण होणार आहे. याची प्रभावी अंमलबजावणी न करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे.

### भेदभावाच्या तक्रारींसाठी २४ तास समता हेल्पलाईन

प्रत्येक संस्थेत समान संधी केंद्र स्थापन करणे बंधनकारक असणार आहे. भेदभावाच्या तक्रारींसाठी २४ तास समता हेल्पलाईन कार्यरत असेल. समता समितीद्वारे १५ दिवसांत चौकशी अहवाल तयार केला जाईल. तक्रारदाराची ओळख गोपनीय ठेवण्याची तरतूदही यामध्ये करण्यात आली आहे.

2 6 JAN 2026

लोकसत्ता

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

# कोल्हापुरात सुरू झालेला महिला सक्षमीकरणाचा विचार राज्यभर जाईल - रूपाली चाकणकर

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** कोल्हापूर ही राजर्षी शाहू महाराजांची पुरोगामी नगरी असून, महाराणी ताराराणी यांच्या कार्याचाही तिला वारसा आहे. इथून सुरू झालेला महिला सक्षमीकरणाचा विचार संपूर्ण राज्यभर जाईल याची खात्री वाटते, असे प्रतिपादन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठात एकदिवसीय 'सक्षमा : महिलांविषयक कायदे जाणीव जागृती आणि अंधश्रद्धा निर्मूलनातून महिला सक्षमीकरण' या कार्यशाळेचे उद्घाटन चाकणकर यांच्या हस्ते झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे, पोलीस उपअधीक्षक सुवर्णा पत्की प्रमुख उपस्थित होते.



**महिला सक्षमीकरण संदर्भातील कार्यशाळेचे उद्घाटन करताना रुपाली चाकणकर.**

महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि शिवाजी विद्यापीठाची अंतर्गत तक्रार समिती, बेटी बचाओ अभियान आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित यावेळी बोलताना चाकणकर म्हणाल्या, राज्याच्या कानाकोपऱ्यात महिला हक्कांसाठीचा लढत असताना पुरुषांची मानसिकता बदलल्यास समाज बदलेल, हे खरेच आहे. महिलांचे अधिकार नाकारण्यात महिलाच अधिक पुढाकार घेतात, हेही खरे आहे. महिलांनीही आपली मानसिकता बदलून अन्य महिलांची मानहानी करू नये.